
प्रीती सावंत दळवी
गुंतता हृदय हे २

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

www.esahity.com
esahity@gmail.com

# गुंतता हृदय हे!!

## पर्व 2

लेखिका : प्रीती सावंत-दळवी

# गुंतता हृदय हे-२!!

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# गुंतता हृदय हे२!!

लेखिका : प्रीती सावंत-दळवी

पत्ता : बी/२०५, धुरी क्लासिक, विद्यामंदिर मार्ग, अंबाडी रोड, वसई (w) - ४०१२०२

Email id :- pspitu2@gmail.com

Link of My FB official page for read more stories written by me :

https://m.facebook.com/preetisawantdalvi/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २ एप्रिल २०२० (रामनवमी)

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**मनोगत:-**



मला वाचनाची खूपच आवड म्हणजे अगदी लहानपणापासूनच. अर्थात तो वारसा मला माझ्या आईकडून आणि आजीकडून मिळाला. त्या दोघींनाही वाचनाची खूप आवड. माझे मराठी इतके चांगले असल्याचे सगळे श्रेय मी माझ्या आजीला देते. तिच्यामुळेच माझे उच्चार आणि लेखन इतके चांगले आहे.

मी मराठी माध्यमातून शिकल्यामुळे मराठी विषय हा नेहमीच जवळचा. मला गद्य भाग जास्त आवडायचा. कोणताही धडा वाचताना त्याआधी तो धडा ज्या पुस्तकातून घेतला आहे त्या पुस्तकाचे नाव आणि लेखकाचे नाव हे दोन्ही दिले जायचे. खूप वाटायचे पुढे काय असेल, ह्या कथेच्या.

असो, यानंतर जेव्हा मी महाविद्यालयात गेल्यावर वाचनालयात माझे नाव नोंदवले. त्यानंतर खऱ्या अर्थाने माझी नवनवीन पुस्तके आणि नवनवीन लेखकांशी ओळख झाली. त्यामध्ये लेखक नारायण धारप हे नाव खूपच महत्वाचे आहे. त्यांच्या कथा, कादंबऱ्या गूढ, रहस्य, वैज्ञानिक विषयांवर असतात. त्यांचे एक पुस्तक, नंतर दुसरे असे करता करता मी त्यांची भरपूर पुस्तके वाचली.

त्यामुळेच कदाचित मला ही गूढ आणि रहस्यमय कथा लिहिण्याची प्रेरणा मिळाली आणि मी "सैतानी पेटी" हे माझे पहिले पुस्तक लिहू शकले. तसेच मी ईसहित्य टीमचे ही खूप खूप आभार मानते.. कारण त्यांनी माझे पहिले पुस्तक प्रकाशित करायला मला मदत केली..

तसेच माझे आई-वडील, सासू-सासरे, माझा नवरा, माझी भावंडे, माझी नणंद या सर्वांचे सुद्धा मी आभार मानीन कारण, त्यांनी मला कथा लिहिण्यास प्रोत्साहित केले आणि त्याचबरोबर वेळोवेळी योग्य ते मार्गदर्शन ही केले. म्हणून कदाचित मी ह्या कथा लिहू शकली.

मी सर्व वाचकांची सुद्धा आभारी आहे की, त्यांनी माझ्या 'सैतानी पेटी' आणि 'गुंतता हृदय हे!! (पर्व १)' या दोन्ही पुस्तकांना भरभरून प्रतिसाद दिला व मला आणखी कथा लिहीण्यास प्रोत्साहित केले.

माझे तिसरे पुस्तक हे 'गुंतता हृदय हे!! (पर्व १)' या पुस्तकाचा पुढील भाग आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी. पहिल्या पर्वाची लिंक सोबत देत आहे जेणेकरून ज्यांनी ते वाचले नसेल ते वाचू शकतील.


प्रेम हे प्रत्येकाला कधीनाकधी होतंच.. असा कोणी व्यक्ती नसेल ज्याला कधी कोणावर प्रेम झालं नसेल.. ही कथा आर्या,समीर, अनिश आणि एक सरप्राईज व्यक्तीरेखा RJ अमेय यांच्यावर आधारित आहे..

कथा वाचता वाचता कधी तुम्ही ह्या कथेत गुंतत जाल.. तुम्हालाच नाही कळणार.. मी लिहिलेली ही कथा तुम्हा वाचकांना कशी वाटली.. हे मला जरूर कळवा.. तसेच मी लिहिलेल्या इतर कथा वाचण्यासाठी मी माझ्या official FB page ची लिंक सुद्धा जोडत आहे..

धन्यवाद🙏

प्रीती सावंत-दळवी

## प्रीती सावंत-दळवी यांची यापुर्वी प्रकाशित झालेली पुस्तके.







- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/guntata_hruday_he__preeti_sawant_dalvi.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/saitani_peti_preeti_sawant_dalvi.pdf

# गुंतता हृदय हे!! पर्व 2

ही कादंबरी काल्पनिक असून यातील व्यक्ती वा स्थळांचे साम्य इतर कुणाशी आढळून आल्यास तो योगायोग समजावा

अनिशने आर्याबरोबर अमेयची ओळख करून देत असताना तो तिला म्हणाला, 'आर्या हा आमच्या रेडिओ स्टेशनचा सुपरस्टार "RJ अमेय" म्हणजेच समीर पटवर्धन..

तुला आश्चर्य वाटलं असेल ना! पण हे खरं आहे की, सगळी मुंबई ह्याला RJ अमेय च्या नावाने ओळखते..पण ह्याचं खरं नाव समीर..'

तो पुढे बोलू लागला, 'समीर, meet my wife आर्या जोशी आणि बरं का, मला ही हे आताच कळलं की ती पण तुझी फॅन आहे..but buddy ur late, कारण तुझ्या ह्या सुंदर फॅनला मी आधीच पटवलं आहे" आणि त्याने समीरच्या हातावर जोरात टाळी दिली व तो आणि समीर दोघेही हसू लागले..

आर्याला काय आणि कसं रिऍक्ट व्हावं हेच कळत नव्हतं.. तिने ही दोघांकडे बघून smile केली आणि समीरला हात मिळविला..स्निग्धा ही समीरला पाहून खूप खुश झाली. पण जेव्हा तिला कळलं की, समीर हाच RJ अमेय आहे..तेव्हा ती थोडी दुःखी झाली.

शेवटी अनपेक्षितपणे का होईना पण समीर हाच आर्याचं पहिलं प्रेम होतं पण ते अमेय ह्या RJ च्या रुपात.

समीरने त्याला महत्वाचं काम आहे हे सांगून त्या कार्यक्रमातून काढता पाय घेतला. कारण अजून काहीवेळ खोटं हसू चेहऱ्यावर आणणं त्याला कठीण जात होतं. त्याने एकवार आर्याकडे पाहिलं आणि मनातल्या मनात तिला तिच्या भावी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. आर्यालाही कळतनकळत त्याच्या मनातल्या भावना समजल्या. तिने ही त्याला नजरेने निरोप दिला..

आज आभाळ खूपच दाटून आलं होतं..पुन्हा पावसाला सुरुवात झाली आणि त्या पाण्यामध्ये समीरचे अश्रूही मिसळून गेले. तो मनातल्या मनात देवाला हेच सांगत होता..

🎶🎶अगर मिले खुदा तो

पूछूंगा खुदाया

जिस्म मुझे देके मिट्टी का

शीशे सा दिल क्यों बनाया🎶🎶

साखरपुडा खूप छान पार पडला. पण पूर्ण साखरपुड्यात RJ अमेयचाच बोलबाला होता. दिवसभराच्या लगबगीने सगळे थकून गेलेले. म्हणून सर्व झोपी गेले. पण आर्याला मात्र झोप येत नव्हती.

ती आज घडलेला प्रसंग सारखा आठवत होती. ती मनात सारखी हाच विचार करत होती, "RJ अमेय आणि तो पण समीर. विश्वासच होत नाहीये. ज्याच्या आवाजाची मी इतकी मोठी फॅन होते. तो सतत माझ्या डोळ्यासमोर होता आणि मला हे कळलच नाही. समीरने मला प्रपोज सुद्धा केलं होतं. पण तो समीर होता. आणि माझं प्रेम तर अनिशवर होतं, मग मी समीरला कशी हो म्हटली असती. पण जर मला आधी कळलं असतं की, समीरचं RJ अमेय आहे, मग काय झालं असतं. काय चाललय काही कळत नाहीये. पण खरं हेच आहे की, माझं अनिशवर खूप प्रेम आहे."

इतक्यात अनिशचा फोन येतो. तशी आर्या पटकन भानावर येते. अनिशची बोलल्यावर आर्याचा मूड फ्रेश होतो. ती स्वतःशीच पुटपुटते, "तसे पण समीर हा माझा खूप चांगला मित्र आहे, तो कधीच माझी निवड नव्हता". असे बोलून ती झोपी जाते.

दुसऱ्या दिवशी सकाळी,

एव्हाना सगळ्या ऑफिसमध्ये ही बातमी पसरते की, समीर हाच RJ अमेय आहे म्हणून. शेखरला ही आता कळून चुकते की, समीर पुन्हा ऑफिसमध्ये येणार नाही. म्हणून तो सगळ्या ऑफिस स्टाफला समीरच्या जॉब सोडण्याबद्दल सांगतो आणि लवकरच कोणीतरी नवीन व्यक्ती त्याच्या जागी नियुक्त केली जाईल हे ही सांगतो. सगळ्यांचे आनंदी चेहरे ही बातमी ऐकल्यावर पडतात. स्निग्धाला ही फार दुःख होते. ती लगेच आर्याला फोन करून सर्व काही सांगते. आर्या सुद्धा हे सगळे एकूण चकित होते. ती समीरला फोन लावण्याचा खूप प्रयत्न करते पण त्याचा फोन स्विच ऑफ येत असतो. राहून राहून ती स्वतःलाच ह्या सगळ्याला कारणीभूत मानत असते. पण ती हे कोणाला सांगूही शकत नसते.

इथे समीर एक नव्या शहरात एक नवीन ओळख बनवायला निघतो. आता त्याला कोणाला काही सांगायची गरज नसते की लपवायची पण. त्याला अमेयला मागे टाकून समीर म्हणून जगायचे असते. तो ट्रेनमध्ये चढतो..पण अजूनही त्याच्या डोळयासमोर फक्त आर्याचाच चेहरा दिसत असतो. अचानक कुठेतरी गाणं वाजत असतं..

🎶🎶तुझको मैं रख लूँ वहाँ

जहाँ पे कहीं है मेरा यकीं

मैं जो तेरा ना हुआ

किसी का नही..किसी का नहीं

ले जायें जाने कहाँ हवाएँ, हवाएँ🎶🎶

समीर आर्याच्या आठवणी मनात ठेवून जीवनाच्या एका नव्या प्रवासाला निघतो.

बँगलोर, भारताच्या कर्नाटक राज्याची राजधानी व सगळयात मोठे शहर. बँगलोर शहराला भारताची माहिती तंत्रज्ञान (IT) उद्योगाची राजधानी किंवा भारताची सिलिकॉन व्हॅली म्हणूनही ओळखले जाते.

असो, समीरला बँगलोरच्या एका खूप मोठ्या IT कंपनीत नोकरी मिळते. २ दिवसानंतर त्याला ऑफिसमध्ये रुजू व्हायचे असते. पण त्याआधी तो बँगलोर शहर फिरायचं ठरवतो. त्याची राहण्याची सोय कंपनीने तिच्या कंपनीच्या कॉम्प्लेक्स मध्ये केलेली असते. तिथे त्या कंपनीतले काही सहकारी आपापल्या कुटूंबासोबत, तर काही एकटे राहत असतात..अत्याधुनिक सुविधा असलेली ती कॉम्प्लेक्स असते. त्या बिल्डिंगच्या समोर एक मोठं गार्डन सुद्धा असतं..समीरला बऱ्यापैकी ती जागा आवडते. तो दोन दिवसात जमेल तितकी माहिती काढून आसपासची ठिकाणे फिरायचे ठरवतो...तो राहत असलेल्या माळयावर २ फ्लॅट असतात..एका फ्लॅटमध्ये समीर तर दुसऱ्या फ्लॅटमध्ये कोणी प्रमोद शास्त्री म्हणून राहत असतं..हे समीरला त्या फ्लॅटच्या नावाच्या फलकावरून कळते..सुदैवाने त्याचे शेजारी हे एक मराठी असतात हे बघून समीरला हायसं वाटतं.

समीरच्या दिवसा जेवणाचा प्रश्न ऑफिसमुळे सुटतो पण रात्रीच्या जेवणाचं काय करायचं..म्हणून जवळ कुठे खानावळ वगैरे असेल तर प्रश्नच मिटेल असा मनात विचार करून समीर शेजारच्या शास्त्री यांच्या दारावरची बेल वाजवतो..

प्रमोद शास्त्री स्वतःच दरवाजा उघडतात..समीर त्यांना स्वतःची ओळख करून देतो व त्यांना तो शेजारच्या फ्लॅटमध्ये राहायला आल्याचं सांगतो..तसेच त्याने बेल वाजवण्याचं कारण ही शास्त्री यांना सांगतो..

शास्त्री समीरला आत बोलवतात आणि त्यांच्या पत्नीला म्हणजेच सुमती शास्त्री यांना हाक मारतात..

शास्त्री कुटूंबाचे प्रमुख प्रमोद शास्त्री हे त्याच IT कंपनीत मोठ्या हुद्यावर असतात..जिथे समीर रुजू होणार असतो..त्यांची बायको सुमती ही गृहिणी..तसेच त्या दाम्पत्याला गौरी आणि वेदांत नावाची मुले आहेत..गौरी २ वर्षांपूर्वीच तिच्या पुढच्या शिक्षणासाठी परदेशी गेलेली असते आणि वेदांत त्याच्या कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असतो. त्या दिवशी रविवार असल्यामुळे सगळे जण घरात असतात.. एकंदरीत ते छोटं पण सुखी कुटुंब असतं..

गप्पांच्या ओघात हे कळते की, सुमती काकू ह्या स्वतः खानावळ चालवत असतात..त्यामुळे समीरचा जेवणाचा प्रश्न सुटतो..शास्त्री काकांना एकंदरीत समीरचा स्वभाव बऱ्यापैकी आवडतो..तसे पण, एकाच ऑफिसमध्ये असल्यामुळे सतत त्यांच्या भेटीगाठी तर होणारच असतात..

असेच काही दिवस जातात..समीर हळूहळू त्याच्या ऑफिसच्या कामामध्ये रुळू लागतो..काही दिवसातच त्याने त्याच्या हुषारीची छाप सर्वांवर पाडलेली असते..त्याचे बॉस ही त्याच्यावर खूप खुश असतात..तसेच समीर ही त्यांची ह्या कंपनीच्या उज्वल भविष्यासाठी केलेली योग्यच निवड होती..याचा त्यांना अभिमान ही वाटतो..

त्याचबरोबर शास्त्री कुटूंबाशी ही समीरचे काही दिवसातच ऋणानुबंध जुळतात..आता तर, सुमती काकी त्याला रोज रात्री घरीच जेवायला बोलवत असतात..तसेच वेदांत ही कधीमधी अभ्यासात काही अडलं तर अभ्यासात समीरची मदत घेत असतो..एकंदरीत फार कमी दिवसात समीर एका अनोळखी शहरात स्थिरस्थावर होतो..तसेच शास्त्री कुटूंबाचा एक सदस्य ही..

तरीही आर्याच्या आठवणी काही त्याच्या मनातून जात नसतात..कधी कधी तर त्या आठवणींतून तो त्याच्या अश्रूंना वाट मोकळी करून देत असतो आणि म्हणत असतो,

🎶🎶ये रूह भी मेरी, ये जिस्म भी मेरा

उतना मेरा नही, जितना हुआ तेरा..

🎶तूने दिया है जो, वो दर्द ही सही

तुझसे मिला है तो ईनाम है मेरा🎶🎶

🎶मेरा आसमाँ ढूंढें तेरी ज़मीं

मेरी हर कमी को है तू लाज़मी🎶🎶

🎶ज़मीं पे ना सही, तो आसमाँ में आ मिल

तेरे े बिना गुज़ारा, ऐ दिल है मुश्किल🎶🎶

आज सकाळपासून सुमती काकूंची लगबग सुरु होती..त्यांना तर काय करू काय नको असं होत होते..अहो, कारणच तसं होतं ना!!

त्यांची मुलगी गौरी चक्क २ वर्षांनी शिक्षण पूर्ण करून घरी येणार होती..

समीर नेहमीप्रमाणे सकाळचा नाश्ता करायला शास्त्री यांच्या घरीच आला..तेव्हा त्याला कळले की, पुढच्या महिन्यात येणारी गौरी याच महिन्यात भारतात येत आहे..ते पण आजच..त्यालाही काकूंना काही मदत करावीशी वाटत होती..पण तो काय मदत करणार..ह्याच विचारात असताना..

अचानक प्रमोद शास्त्री यांचा समीरला फोन आला..आज एक महत्वाच्या मीटिंगमुळे ते सकाळी लवकरच ऑफिसला गेले होते व गौरीच्या अचानक येण्याच्या बातमीमुळे ते त्यांची मीटिंग पुढे ढकलू शकले नाही आणि आता त्यांना ऑफिसमधून निघणे ही मुश्किल होते..म्हणून त्यांनी समीरला गौरीला एअरपोर्ट वरून घरी घेऊन यायची विनंती करायाला फोन केला होता..

समीरला ही कोणत्याही प्रकारे का होईना पण शास्त्री कुटूंबाला मदत करायला मिळतेय याचे समाधान वाटले..

त्याप्रमाणे तो वेळेच्या आधीच गौरीची आणायला एअरपोर्टवर पोहोचला..

गौरीला तिचे बाबा तिला एअरपोर्टवर न्यायला येतील असे अपेक्षित होते..पण इथे तर कोणीच दिसत नव्हते..तिने शास्त्रींना फोन लावायचा प्रयत्न केला..पण तो लागत नव्हता..मग तिने सुमती काकूंना फोन लावला..तर तो व्यस्त येत होता.."ही आई कोणाशी बोलतेय? ही पण ना" गौरी स्वतःशीच पुटपुटली..

इतक्यात एक तरुण, हँडसम, डॅशिंग, गोरागोमटा मुलगा तिच्या समोर आला आणि म्हणाला,"तुम्ही गौरी शास्त्री का?"

गौरी त्याला बघतच राहिली..त्याच्या चेहऱ्यावरून तिची नजरच हटत नव्हती..यात ती उत्तर द्यायचं ही विसरून गेली..

इतक्यात तिला भानावर आणत त्याने तिला पुन्हा तेच विचारले..तसे तिने हो असे उत्तर दिले..

मग त्याने स्वतःची ओळख गौरीला करून देत तो म्हणाला, "हाय, मी समीर पटवर्धन. मला तुमच्या बाबांनीच तुम्हाला घरी न्यायला पाठवलंय.."

तेवढ्यात सुमती काकूंचा समीरला फोन आला..तसे समीरने गौरीशी भेट झाल्याचे काकूंना सांगितले व गौरीला बोलायला ही दिले..

गौरी गाडीत बसली..अर्धा वेळ तर ती समीरलाच न्याहाळत होती..समीर शांतपणे गाडी चालवत होता..काहीतरी बोलावं म्हणून गौरीने संभाषण सुरू केले व ती म्हणाली, "तुम्ही बाबांच्या ऑफिसमध्ये नवीनच कामाला लागलात का? कारण मी तुम्हाला याआधी कधी बघितलं नव्हतं..आणि बाबा का नाही आले? "

यावर समीरने तो इथे आल्यापासून ते शास्त्री कुटूंबाशी झालेली ओळख आणि आज शास्त्री काकांना अचानक आलेले महत्वाचं काम..इथपर्यंत सर्व काही सांगितलं..

बोलता बोलता कधी घर आलं कळलंच नाही..

समीरने गाडीतून गौरीचं सामान उतरवलं व गौरी आणि तो शास्त्रींच्या घरी गेले..सुमती काकू गौरीची फारच आतुरतेने वाट पाहत होत्या..त्यांनी गौरीला आत घ्यायच्या आधी तिच्या वरून भाकर तुकडा ओवळला आणि तिच्या पायावर पाणी टाकले व तिच्या डोळ्यांना पाणी लावून तिला त्यांनी घरात घेतलं..समीरने गौरीचं सामान घरात ठेवलं आणि सुमती काकू आणि गौरीचा निरोप घेऊन तो ऑफिसला निघून गेला..

सुमती काकूंची तर नुसती बडबड चालू होती..पण गौरीचं ह्या सगळ्याकडे लक्ष कुठे होतं..ती तर समीरचा विचार करत गालातल्या गालात हसत होती..जणू हे सगळं एक स्वप्नच असेल!! ती मनातल्या मनात गुणगुणत होती,

🎶कैसी हलचल है

हर पल क्यूं चंचल है।।

🎶ये किसने जादू किया

क्यूं मेरा झूमे जिया।।

🎶क्या मेरा दिल खो गया।।

ये मुझको क्या हो गया।।🎶

"गौरी तुझं लक्ष कुठंय, मी आपली उगाचच एकटी बडबडतेय..माझ्या लक्षातच नाही आलं की, तु प्रवासाने दमली असशील..पहिलं हे खाऊन घे आणि तू आराम कर..मग आपण निवांत बोलू", सुमती काकू म्हणाल्या.

समीरबद्दल सगळं कळूनही मुद्दाम गौरीने त्याचा विषय काढत ती काकूंना म्हणाली, "आई तो मला एअरपोर्टवर न्यायला आलेला मुलगा..." असं बोलत ती मधेच थांबली. तेव्हा सुमती

काकू म्हणाल्या, "अगं, तो समीर, आपल्या शेजारीच राहतो. तुझ्या बाबांच्याच कंपनीमध्ये कामाला आहे..खूप गुणी मुलगा आहे हो!! कालच तुझे बाबा सांगत होते, फार कमी वेळात त्याने ऑफिसमध्ये सर्वांची मने जिंकली म्हणून!! त्याचे आई-वडील मुबंईमध्ये असतात..तो एक वेळेला आपल्याकडेच जेवतो..तसे तर पहिलं पहिलं मी त्याला जेवणाचा डबा पाठवायची..मग हेच म्हणाले, समीरला घरीच बोलवत जा जेवायला..एक वेळचं जेवण तरी व्यवस्थित जेवेल..मग काय रोज रात्री तो इथेच जेवायला लागला..माझ्यासाठी जसा वेदांत तसा तो.."

असं बोलून सुमती काकू त्यांच्या कामात गुंतल्या आणि गौरी बेडरूममध्ये झोपायला गेली..प्रवासाने ती इतकी दमली होती की, पडल्या पडल्या तिला झोप लागली..

जेव्हा सुमती काकूंनी तिला चहासाठी उठवलं तेव्हा तिला जाग आली..चहापाणी झाल्यावर गौरीने तिची बॅग खाली करायला घेतली..सगळी आवराआवर करता करता जेवणाची सुद्धा वेळ झाली..सुमती काकूंनी सगळयांना जेवायला बोलविले..पण समीरला अचानक काही काम आल्यामुळे त्याला तातडीने दिल्लीला जावं लागलं..त्यामुळे २ दिवस तरी समीरचं येणं काही शक्य नव्हतं..त्याने फोन करून संध्याकाळीच काकूंना ह्याची सूचना दिली होती..

सगळे जेवायला बसले..पण समीर अजून आला नव्हता..गौरी त्याचीच वाट बघत होती म्हणून भूक लागूनही जेवायला टंगळमंगळ करत होती..तिला कुठे माहीत होतं की, समीर २ दिवसांसाठी दिल्लीला गेलाय म्हणून..न राहवून मग तिने समीरचा विषय काढलाच..

"तो समीर नाही आला जेवायला", गौरी म्हणाली.

तेवढ्यात तिचे बाबा म्हणाले, "अगं, तो कसा येईल आज जेवायला, तो तर ऑफिसच्या कामासाठी दिल्लीला गेलाय..२ दिवसांनी परतेल." हे ऐकून गौरी थोडी उदास झाली..

समीरला बघताक्षणी ती त्याच्या प्रेमात पडली होती आणि समीर होता पण तसा की, कोणीही त्याच्या प्रेमात पडेल..

बघता बघता २ दिवस निघून गेले..गौरीने एका IT कंपनीत जॉबसाठी विचारणा केली होती..त्यासंबंधी तिची आज मुलाखत होती. सकाळपासून तिची नुसती लगबग चालली होती..ती मुलाखतीसाठी पूर्व तयारी करत असताना अचानक समीर घरी आला..त्याला पाहून गौरीला कोण आनंद झाला, विचारूच नका..

सुमती काकुंकडून त्याला कळलं की, गौरीची आज एका IT कंपनीत मुलाखत आहे..तेव्हा गौरीने समीरला त्याची पूर्वतयारी करून घेण्यास मदत मागितली..मग काय समीरनेच तिची पूर्वतयारी करून घेतली..खरं म्हणजे गौरी मुलाखतीला एकदम तयार होती. तिला खरं तर समीरच्या मदतीची काहीच गरज नव्हती पण तो तर समीरशी बोलण्याचा एक बहाणा होता..

बोलता बोलता समीरला तिने मुलाखतीच्या ठिकाणी सोडण्यासाठी सुद्धा मनवले..समीरचे ऑफिस पण बाजूच्या बिल्डिंगमध्ये असल्यामुळे तो सुद्धा तिला त्या ठिकाणी सोडायला तयार झाला..काही वेळातच सुमती काकूंचा निरोप घेऊन दोघेही निघाले..

गौरीला गाण्यांची फार हौस होती..तिला हिंदी-मराठी गाणी जास्त आवडत..ती २ वर्ष परदेशात राहूनही तिचा भारतीय संगीताबद्दलचा आदर यत्किंचितही कमी झाला नव्हता..तिला एकांतात रोमँटिक गाणी ऐकायला फार आवडत असे..आणि आता तर ती गाणी ऐकायला समीर नावाचं कारणही मिळालं होतं..

दोघेही गाडीत बसले..समीरशी आता काय बोलावं हे गौरीला सुचत नव्हतं आणि समीरला ही..म्हणून समीरने गाडीतला म्युजिक प्लेअर चालू केला..आणि एक रँडम गाणं लावलं..

🎶कहते हैं ख़ुदा ने इस जहाँ में

सभी के लिए किसी ना किसी को है बनाया

हर किसी के लिए

तेरा मिलना है उस रब का इशारा

मानो मुझको बनाया तेरे जैसे ही किसी के लिए

कुछ तो है तुझ से राबता 🎶

असं वाटत होतं की, जणू गौरी तिच्या मनातील भावना समीरला सांगत होती...पण समीर पुन्हा आर्याच्या आठवणींमध्ये हरवून गेला..

समीरने गौरीला तिच्या मुलाखतीच्या ठिकाणी सोडले आणि तो त्याच्या ऑफिसला निघून गेला..

एकंदरीत गौरीची मुलाखत छान झाली. तिला काही वेळ बाहेर बसण्यास सांगितले गेले..

थोड्या वेळाने गौरीला पुन्हा केबिनमध्ये बोलावले गेले व सरळ तिच्या हातात तिच्या नियुक्तीचे पत्र दिले गेले..

गौरीला खूप आनंद झाला आणि होणारच ना..तिला कोणाच्याही शिफारशी बिना जी नोकरी मिळत होती..

तिला ही बातमी कधी एकदा घरी सांगतेय असं झालं होतं..

ऑफिसच्या काही फॉर्मलिटी पूर्ण करून ती तडक घरी निघाली..तिला उद्या पासूनच ऑफिसमध्ये रुजू व्हायला सांगितले गेले होते..

असो, ती घरी मिठाई घेऊन आली आणि तिने सुमती काकूंना आनंदाची बातमी दिली..काकूंनी देवाजवळ मिठाई ठेवून नमस्कार केला..मग गौरीने तिच्या बाबांना फोन करून ही बातमी कळवली..आज सगळं शास्त्री कुटूंब अगदी आनंदात होतं..सुमती काकूंनी रात्री गोडाधोडाचा पण बेत ठरविला..

अरे हो!! गौरीने समीरला ही आनंदाची बातमी कुठे दिलीये..हेच विचारायचं होतं ना तुम्हाला..पण ती देणार तरी कशी!! त्याचा नंबर कुठे होता तिच्याकडे..

कळलं तुम्ही काय विचार करताय ते..

अहो, पण तुम्हीच विचार करा..ती काकुंकडे कशी काय मागेल समीरचा नंबर..!!

मग काय समीरची वाट बघण्याखेरीज गौरीकडे काहीच पर्याय उरला नव्हता..समीर नेहमीप्रमाणे रात्री जेवायला हजर झाला..तो आल्याआल्या काकांनी त्याला आनंदाची बातमी दिली..त्यामुळे गौरीचा चेहरा जरा हिरमुसला..कारण तिला ही बातमी स्वतः समीरला सांगायची होती..जेवणं आटोपलं..तसं समीर काकांशी थोडं बोलून सगळयांना शुभ रात्री बोलून झोपायला गेला..

दुसऱ्या दिवशी गौरी लवकर उठली..आज तिच्या ऑफिसचा पहिला दिवस जो होता..गौरीची तयारी झाली आणि तिने देवाला व तिच्या आई-बाबांना नमस्कार केला आणि ती निघणार इतक्यात समीर दरवाजात उभा..तिला कोण आनंद झाला..समीरने तिच्यासाठी फुलांचा बुके आणला होता..तो त्याने तिच्या हातात ठेवला आणि त्याने गौरीचे अभिनंदन केले व तो ऑफिसला जायला निघाला..तेवढयात त्याच्या लक्षात आले की, गौरीचं ऑफिस तर त्याच्या ऑफिसच्या जवळच आहे..पण तो गौरीला हे कसं विचारणार..पण काय माहीत कसं..शास्त्री काकांनी स्वतः गौरीला आज समीर बरोबर जायला सांगितले..गौरीला खूप खूप आनंद झाला..

गौरी समीरच्या गाडीत बसली..आज तिने काल सारखचं समीरला गाणं लावायला सांगितलं..त्याने कालसारखचं एक रँडम गाणं लावलं..

🎶कितने ही दूर दूर हों उन दोनों के रास्ते

मिल जाते हैं जो बने एक दूजे के वास्ते;एक दूजे के वास्ते ||

जैसे दिल है धड़कन है एक दूजे के वास्ते

जैसे आँख है दर्पण है एक दूजे के वास्ते

जैसे बरखा सावन है एक दूजे के वास्ते

एक सजनी एक साजन है एक दूजे के वास्ते🎶

गौरी पूर्णपणे त्या गाण्यात हरवून गेली होती..ऑफिस कधी आलं तिला कळलं सुद्धा नाही..समीरने गौरीला हाक मारताच ती भानावर आली आणि तिच्या लक्षात आले की, ऑफिस तर आलं पण.. गौरीने समीरला निरोप दिला..आणि ती ऑफिसमध्ये निघून गेली..

काही दिवस असेच गेले..गौरी आता पूर्णपणे तिच्या कामात रुळली होती..समीर तर तिला रोज रात्री घरी भेटायचाच पण त्याच्याशी काही जास्त बोलणं व्हायचं नाही..

एक दिवस अचानक संध्याकाळी खूप पाऊस सुरू झाला..इतका की काही समजायच्या आधीच सगळीकडे पाणीचं पाणी झाले..

जवळ जवळ सुनामीचं ती..

त्यादिवशी गौरी सोडून सुदैवाने सगळेच घरी वेळेवर आले होते..अगदी समीर सुद्धा..

पण त्यादिवशी गौरीला एक महत्वाचा प्रोजेक्ट दिला गेला होता..त्यामुळे तिने आधीच घरी तिला यायला थोडा उशीर होईल असे कळवले होते..तेव्हा तर वाटलं पण नव्हतं की, इतका पाऊस पडेल म्हणून काकूंनी ही गौरीला परवानगी दिली होती..

आता मात्र कहर झाला, पाऊस थांबायचं नाव ही घेईना..त्यात गौरीचा फोन पण लागत नव्हता..सुमती काकू फारच चिंतीत झाल्या..काकांना ही काय करावं हे कळतं नव्हतं..वेदांतला एकट्याला ही ते इतक्या पावसात पाठवू शकत नव्हते..तेवढ्यात समीर तिथे आला..

काकांनी सगळी हकीकत समीरला सांगितली..समीरने गौरी कदाचित ऑफिसमध्येच असेल असे सांगून काका काकूंना दिलासा दिला..आणि काही वेळातच मी येतो असे सांगून तो निघून गेला..

इथे पावसाचा कहर वाढतच चालला होता..गौरी हिम्मत करून पण ऑफिसमधून निघू शकत नव्हती..कारण पाणीच इतकं भरलेलं..त्यात ती आज सकाळी घाईघाईत फोन चार्ज करायचा विसरली होती म्हणून तिचा फोन बंद झाला होता..लाईट गेल्यामुळे आता ती तो चार्ज ही करू शकत नव्हती..ऑफिसमध्ये काही निवडक सहकारीच थांबले होते..बाकी सगळे घरी निघून गेले होते..गौरी खूपच टेन्शन मध्ये आली होती..तिने एका सहकाऱ्याकडे फोन मागितला आणि ती घरचा फोन लावू लागली..पण तो काही लागत नव्हता..तिला काय करावे काहीच कळत नव्हते..

तिला ऑफिसमध्ये रात्र काढणे कठीण जात होते..घरची, आई-बाबांची तिला खूपच आठवण येत होती..

तिला अगदी रडू कोसळले..इतक्यात तिच्या हातात कोणी तरी रुमाल दिला..तिने वर पाहिले तर तो समीर होता..समीरला पाहताच ती इतकी खुश झाली की, तिने त्याला घट्ट मिठी मारली आणि ती रडू लागली..समीरने तिला दिलासा दिला..आणि म्हणाला, "रडू नकोस गौरी, मी आलोय ना..पाऊस थांबला की, आपण निघू..तू काही खाल्लस का?" यावर गौरीने नाही असे उत्तर दिले..मग समीरने त्या ऑफिसच्या कॅन्टीनमधून जे मिळेल ते आणले आणि गौरीला दिले..

गौरी समीरकडे बघत होती..तिला विश्वासच होत नव्हता की, समीर तिच्यासाठी इथे आला होता..

तिने समीरचा हाथ घट्ट पकडून ठेवला होता..त्याला पाहता पाहता ती स्वतःच्या विश्वात हरवून गेली..ती सारखी हेच मनोमनी बोलत होती..

🎶थोड़ा सा प्यार हुआ है थोड़ा है बाकी

हम तो दिल दे ही चुके

बस तेरी हाँ है बाकि

थोड़ा सा प्यार हुआ है थोड़ा है बाकी🎶

सुदैवाने रात्री पावसाचा जोर ओसरला आणि हळूहळू पाऊस पडायचा ही थांबला..पण सगळीकडे कमरे इतके तरी पाणी साचले होते..त्यामुळे सकाळ शिवाय निघणे ही कठीण होते..ऑफिस मधले सहकारी पेपर वगैरे पसरून त्यावर झोपी गेले..

गौरीने तिच्याजवळ असलेला स्कार्फ खाली अंथरला आणि समीरला झोपायला सांगितले..पण समीर गौरीला म्हणाला, "तू झोप, मी इथेच बसतो"

मग गौरी कसली झोपतेय, ती पण त्याच्या बाजूला बसून राहिली..कधी मध्ये त्या दोघांचा डोळा लागलाच तर कधी समीरचं डोकं गौरीच्या खांद्यावर जाई..तर कधी गौरीचं समीरच्या..

गौरीला तर हे सगळं स्वप्न वाटत होतं..क्षणभर तर ती इतकी स्वार्थी झाली की, तिला हा पाऊस थांबू नये असचं वाटत होतं..हा हा म्हणता रात्र निघून पण गेली..

सकाळी आवाजाच्या गलबल्याने समीरला जाग आली..पाहतो तर गौरी त्याला अगदी पकडून झोपली होती..त्याने गौरीला उठवलं..तशी गौरी समीरला अजून बिलगली..समीरला तिच्या अश्या वागण्याचं फार हसू आलं..समीर प्रथमच तिच्याकडे इतकं निरखून पाहत होता..तिचा चेहरा खूपच निरागस वाटत होता..पण तिच्या केसांची बट तिला त्रास करत होती..म्हणून तो ती बाजूला करणार..इतक्यात गौरीने डोळे उघडले..तसे समीरने लगेच दुसरीकडे बघितले..

गौरी गालातल्या गालात हसली..समीरने तिला तिचा हात दाखवला..तिने तो पटकन समीरच्या गळ्याभोवताहून बाजूला केला..नंतर काही घडलंच नाही असं दाखवत दोघेही उठले..

दोघांनी उठून बघितलं तर पाणी ओसारले होते..रात्रभर ऑफिस मध्ये राहिलेले लोक ही घरी चालले होते..हे दोघेही उठले..एव्हाना लाईट्स पण आल्या होत्या..समीरने घरी फोन करून काकांना मी गौरीला घेऊन येतोय असे सांगितले..त्याने काल रात्री काकांना गौरी ऑफिसमध्ये असल्याचे आधीच सांगितले होते व पाणी ओसरल्यावर मी तिला सुखरूप घरी आणेन असं आश्वासन ही दिलं होतं..त्यामुळे काका निश्चिन्त होते आणि त्याबद्दल त्यांनी सुमती काकूंलाही सांगितले...हे ऐकून सुमती काकूंची चिंता मिटली जरी असली तरी ते दोघे सुखरूप घरी यावेत म्हणून त्या मनोमनी देवाजवळ प्रार्थना करीत होत्या..

समीरच्या गाडीची पावसाच्या पाण्यामुळे पुरती वाट लागली होती..त्यामुळे तिचे चालणे खूप मुश्किल होते..कालच्या अचानक च्या पावसामुळे टॅक्सी मिळणे ही कठीण दिसत होते..

मग दोघांनी चालत जायचं ठरवलं..गौरीला तर खूपच मस्त वाटत होतं..कारण ती समीरच्या खूप जवळ होती..आणि का कोण जाणे तिला हा रस्ता संपू नये असच वाटत होतं..ती सारखी मधेच समीरकडे बघत मनात गुणगुणत होती..

🎶जादू है तेरा ही जादू

जो मेरे दिल पे छाने लगा

दीवाने मेरे ये तो बता क्या किया तूने

मीठा सा दर्द होने लगा🎶

काही वेळात दोघेही सुखरूप घरी पोहोचले..शास्त्री कुटूंबाने समीरचे खूप खूप आभार मानले..गौरीने ही काकूंना घट्ट मिठी मारली आणि काल घडलेला प्रसंग सांगितला..आणि समीर आल्यामुळे तिला खूप धीर आला हे ही तिने सांगितले..

त्यानंतर गौरी आणि समीर दोघेही फ्रेश झाले आणि काकूंनी दोघांना जेवायला वाढले..समीर जेवून त्याच्या घरी निघून गेला..गौरी पण आराम करायला तिच्या खोलीत आली..पण तिला झोप कुठे लागत होती..सारखा कालचा आणि आजचा दिवस तिच्या डोळयासमोर येत होता..

इथे समीरची हालत काही वेगळी नव्हती..कालच्या प्रसंगामुळे त्याला इतकं तर नक्की कळलं होतं की, गौरीला त्याच्याबद्दल आकर्षण झालयं म्हणून.. पण याआधी ही खूप मुलींना समीरबद्दल अशी भावना वाटली होती..पण का कोणास ठाऊक त्याला गौरी या सगळयांपेक्षा वेगळी वाटत होती..अर्थात, त्याचं प्रेम फक्त आर्यावर होतं..पण आर्या तर अनिशवर प्रेम करत होती..एव्हाना त्यांचे लग्न ही झालं असेल, असा विचार अचानक समीरच्या मनात आला..आणि त्याला खूप रडू आले..त्याने कितीही विचार केला तरी आर्याला विसरणे त्याला या जन्मी शक्य नव्हते..म्हणून तर तो तिच्यापासून इतक्या लांब ह्या नवीन शहरात आला होता..त्याला काहीवेळ गौरीचा विसर पडला आणि तो आर्याच्या आठवणींमध्ये हरवून गेला..त्यामध्ये त्याला कधी झोप लागली हे त्याचे त्यालाच कळले नाही..

रात्री अचानक त्याचा फोन वाजल्यामुळे त्याला जाग आली..तो फोन वेदांतचा होता..समीरला जेवायला बोलावण्यासाठी केलेला..समीरने उठून प्रथम लाइट्स लावल्या आणि त्याने घड्याळाकडे बघितले तर रात्रीचे ९ वाजले होते..तो पटकन फ्रेश झाला आणि थोड्या वेळातच शास्त्रींच्या घरी पोहोचला..जेवण उरकल्यावर तो परत त्याच्या घरी जाणार.. तेवढ्यात गौरीने त्याला थांबवले आणि त्याला तिच्या नवीन प्रोजेक्टमधल्या काही अडचणी सोडवून देण्याची विनंती केली..

खरं तर समीरने मनातल्या मनात गौरीपासून थोडं लांब राहण्याचा विचार केला होता..पण का कोण जाणे..तिला नाही म्हणायचं सोडून..तो चक्क तिला मदत करायला तयार झाला..त्याचं त्यालाच आश्चर्य वाटलं..

समीरबरोबर अजून काही वेळ घालवायला मिळेल ह्या विचारानेच गौरी खूप आनंदी झाली..त्याचबरोबर संधी मिळताच तिने समीरला तिच्या मनातल्या भावना व्यक्त करायच्या असेही ठरविले..

ठरल्याप्रमाणे रोज तिच्या प्रोजेक्टचा जो काही रिपोर्ट असेल तो समीरला सांगून मग त्यामध्ये काही अडचणी आल्या तर त्या समितीकडून सोडवून घ्यायच्या तिने ठरविले..त्यामुळे तिला समीरची खूप मदत होणार होती..

प्रोजेक्टचं काम सुरळीत चाललं होतं..प्रोजेक्टमुळे रोज समीरचं आणि गौरीचं प्रत्यक्षात भेटणं होत होतं..समीर फक्त कामाच्याच गोष्टी गौरीशी करत असे..पण गौरी योग्य संधीची वाट बघत होती..

म्हणतात ना, " अगर किसी चीज को शिद्दत से चाहो तो पूरी कायनात भी उसे तुमसे मिलाने की कोशिश मे लाग जाती है।।" गौरीला ती योग्य संधी मिळाली..

काका,काकू आणि वेदांत ३-४ दिवसांसाठी मुबंईला त्यांच्या एका नातेवाईकाच्या लग्नाला जाणार होते..गौरीला सुट्टी मिळणे कठीण होते म्हणून तिने घरी राहणे पसंद केले..काकूंनी तिला सांभाळून राहा आणि रोज फोन कर अश्या सूचना दिल्या आणि त्यांनी समीरला ही गौरीकडे लक्ष द्यायला सांगितले..तसेच स्वतःची काळजी घे..हे समीरला सांगायला सुद्धा त्या विसरल्या नाहीत..

गौरी आज लवकर ऑफिसमधून घरी आली आणि तिने स्वतः जेवण बनवलं..ते पण समीरच्या आवडीचं..तिला इतक्या दिवसात तिच्या आईकडून समीरच्या काही आवडीनिवडी कळल्या होत्या..तिने छान टेबल सजविले आणि ती समीरच्या येण्याची वाट बघू लागली..

सुमती काकूंनी समीरला गौरीचा फोन नंबर देऊन ठेवला होता..कारण त्यांना माहीत होते की, त्याच्या अनुपस्थितीत समीर त्यांच्या घरी जाणे टाळेल म्हणून..समीरला त्याची आठवण झाली आणि त्याने गौरीला फोन केला..

गौरीने फोन उचलला..समीरचा आवाज ऐकताच ती खूपच खुश झाली आणि समीरला म्हणाली, "कुठे आहेस तू? कधीपासून तुझी वाट बघतेय मी जेवायला..तू आधी घरी ये बघू..मग काय ते बोल" असे म्हणून तिने फोन ठेवून पण दिला..मग काय समीरला घरी जाण्याशिवाय नाईलाज होता..त्याने शास्त्रींच्या घराची बेल वाजविली..गौरीने दरवाजा उघडला..

आज गौरी खूपच छान दिसत होती..तिने साधासा लाईट गुलाबी रंगाचा कुर्ता घातला होता..चॅन केस मोकळे सोडले होते..आणि त्यावर हलकासा मेकअप करून डायमंडची टिकली लावली होती आणि त्या पेहरावला साजेसे कानात झुमके घातले होते..समीरला अचानक आर्याची आठवण झाली..त्याला जणू क्षणभर आर्याच समोर असल्याचा भास झाला..गौरीने त्याचा हात पकडून त्याला आत नेले..तिने खोलीभर मंद प्रकाश ठेवला होता व टेबलावर सगळीकडे मेणबत्या लावल्या होत्या..सगळं वातावरण खूपच रोमँटिक दिसत होतं..

गौरीने समीरचा हात पकडून त्याला घरात आणले..तिने खोलीभर मंद प्रकाश ठेवला होता व टेबलावर सगळीकडे मेणबत्या लावल्या होत्या..सगळं वातावरण खूपच रोमँटिक दिसत होतं..

समीर काही बोलणार..इतक्यात गौरीने त्याच्या तोंडावर बोट ठेवलं आणि अगदी फिल्मीस्टाइल समीरला प्रपोज केलं..

ती म्हणाली, "समीर तुला पहिल्यांदा पाहताक्षणीच मी तुझ्यावर आकर्षित झाले होते आणि हळूहळू कधी तुझ्या प्रेमात पडले हे कळलं देखील नाही..त्यादिवशी तूला ऑफिसमध्ये बघून मी इतकी खुश झाले की, तुला सांगू शकत नाही..मी खूप खूप प्रेम करते तुझ्यावर समीर..एक दिवसासाठी नाही, एक क्षणासाठी नाही तर आयुष्यभरासाठी मला तुझी साथ हवी आहे..माझ्याशी लग्न करशील??"

समीर तिच्याकडे पाहून मंद हसला आणि म्हणाला,"गौरी तू खूप चांगली मुलगी आहेस आणि मला ही तू खूप आवडतेस..का कोण जाणे तुझा सहवास मला हवाहवासा वाटतो..तुला काही होणे... मी सहनच करू शकत नाही..म्हणून त्यादिवशी तू संकटात असताना मी कसल्याही परिणामांचा विचार न करता तुझ्यापर्यंत पोहोचलो..तुला सुखरूप बघून माझ्या जिवात जीव आला होता..मी जितका तुझ्यापासून लांब जायला बघतो तितका मी तुझ्या जवळ येतो..पण तरीही मी तुझा स्वीकार नाही करू शकत कारण माझा भूतकाळ.."

असे म्हणून समीर मधेच थांबला..गौरी सगळं लक्ष देऊन ऐकत होती..समीर थांबताच ती लगेच म्हणाली,"मला तो जाणून घेण्याची ही इच्छा नाही..पण मला तुझा वर्तमान आणि भविष्य व्हायचंय.."

तरीही समीरने गौरीला त्याच्या पूर्वआयुष्याविषयी सर्व काही सांगून टाकलं..त्याचे मुबंईहुन बेंगलोरला सेटल होण्याचं हेच तर कारण होत..गौरी हे सगळं ऐकून स्तब्ध झाली..

तिला हे ऐकून खूप वाईट वाटलं की, आजपर्यंत जो समीर फक्त तिचा आहे असे तिला वाटत होते..तो दुसऱ्याच मुलीवर प्रेम करतो..पण तिला हे ही कळून चुकले की, समीरचे प्रेम हे एकतर्फी होते..पण तिने समीरला ते जाणवू दिले नाही..

पण समीरला ही हे माहीत होते की, आर्या फक्त अनिशवर प्रेम करत होती..आर्याचं खरं प्रेम तर RJ अमेयच्या आवाजावर होते..पण जेव्हा तिला कळले की, समीर हाच RJ अमेय आहे..तेव्हा ती दुःखी झाली..पण तिने हे स्वीकार केलं की, तिचं खरं प्रेम हे अनिशवरच आहे..

समीर मनात विचार करत होता की, आतापर्यंत तर आर्या आणि अनिशचे लग्न ही झाले असेल..पण तरीही आर्याला विसरणं या जन्मी तरी त्याला शक्य नव्हतं..आणि आता गौरी...???? असा विचार करता करता तो गौरीकडे पाहू लागला..

गौरी त्याच्याकडेच बघत उभी होती..तिला समीरकडून उत्तर हवं होतं..ती त्याचीच वाट पाहत होती..पण तिला जबरदस्तीने हे प्रेम जिंकायचं नव्हतं..कारण मग त्या प्रेमाला काहीच अर्थ राहिला नसता..

ती समीरजवळ गेली आणि तिने समीरचा हात तिच्या हातात घेतला आणि ती म्हणाली,"समीर मला माहीत आहे..पहिलं प्रेम प्रत्येकाच्या जीवनात महत्वाचं असतं..आपण त्यासाठी आपलं सर्वस्व वाहून टाकतो..कसल्याही परिणामांचा विचार न करता आणि एक दिवस जेव्हा आपल्याला कळतं की, ज्याच्यासाठी आपण हे सगळं करतोय त्याचं प्रेम दुसऱ्याच कोणा व्यक्तीवर आहे..तेव्हा ज्या वेदना होतात त्या शब्दांत नाही मांडता येत..कधीकाळी तू जिथे उभा होतास..तिथेच मी आज उभी आहे..मला जे वाटतंय..ज्या वेदना होताएत त्या फक्त तू आणि तूच समजू शकतोस..पण तरीही मी तुला जबरदस्ती करणार नाही..पण हा माझा विश्वास आहे की, एक ना एक दिवस तू माझ्या प्रेमाला नक्की समजशील..आणि मी त्या दिवसाची वाट पाहीन" असं बोलून गौरी तिच्या खोलीत निघून गेली..

मग तो ही त्याच्या घरी निघून गेला..रात्रभर त्याच्या मनात गौरीचे विचार येत होते..आज पहिल्यांदा त्याला आर्याची अजिबात आठवण आली नाही..त्याला गौरीशी झालेली त्याची पहिली भेट आणि त्यानंतर तिच्याबरोबर घालवलेला प्रत्येक क्षण आठवू लागला..त्याला मनात खूप छान वाटत होते की, कोणतरी आहे जे त्याच्यावर त्याच्यापेक्षा ही जास्त प्रेम करते..पण आज त्याने

गौरीचं मन दुखवलं होतं..याचं त्याला खूप वाईट वाटलं..आणि त्याने मनाशी निश्चय केला की, उद्याच तो गौरीला तिच्याबद्दलच्या त्याच्या मनातील भावना सांगेल व तो सकाळ होण्याची वाट पाहू लागला..

सकाळी लवकर उठून त्याने शास्त्रींच्या घराची बेल वाजवली..पण २-३ वेला वाजवून ही गौरीने दरवाजा उघडला नाही..मग त्याने तिला फोन करायचे ठरविले..तर तिचा फोन बंद होता..समीर खूप काळजीत पडला..त्याच्या मनात नको नको ते संशय यायला लागले..म्हणून त्याने पुन्हा एकदा दारावरची बेल वाजवली आणि गौरीला फोन सुद्धा केला..पण पुन्हा तेच झालं..आता मात्र त्याला खात्री झाली की, गौरीने स्वतःच्या जीवाचं बरंवाईट तर केलं नसेल..म्हणून त्याने दरवाजाला हिसका दिला..पण ते उघडणं त्याला शक्य होईना..मग त्याने चावीवाल्याला बोलवायचं ठरविले..पण जर वॉचमनला सांगितलं तर तो उगीच बिल्डिंगमध्ये हाहाकार करेल..म्हणून तो स्वतःच खाली गेला आणि चावीवाल्याला घेऊन आला..तो दरवाजा उघडेपर्यंत समीर गौरीला फोन लावत होता..पण समोरून अजूनही फोन बंद होता..

काही वेळानंतर शास्त्रींच्या घरचा दरवाजा उघडला..तसं समीर घाईघाईत आत गेला आणि सगळीकडे गौरीला शोधू लागला..पण आश्चर्य!!

घरात कुणीच नव्हते..गौरीचा फोन डायनींग टेबलवर होता आणि तो खरच बंद होता..समीर विचारात पडला की, गौरी कुठे आहे? इतक्यात चावीवाल्याचा आवाज आला..त्या आवाजाने समीर भानावर आला त्याने त्याचे पैसे दिले आणि तो चावीवाला निघून गेला..समीर परत सर्व घरात गौरीला शोधू लागला..इतक्यात गौरी घरी आली आणि तिने लिफ्टकडे चावीवाल्याला पाहिले होते..हा कोण माणूस हा ती विचार करतच होती, इतक्यात तिला तिच्या घराचा दरवाजा सताड उघडा दिसला..गौरी घाबरली आणि तिने तिच्या हातातलं सामान दरवाज्यातच टाकलं व ती धावतच घरात गेली..तर आत समीर होता..समीरचे ही लक्ष गौरीकडे गेले..

गौरीला पाहताच तो खूप खुश झाला..त्याने लगेच तिला घट्ट मिठी मारली..गौरीला काहीच कळतं नव्हते की, काय चालययं ते..ती शांत उभी होती..

समीर बोलू लागला, "कुठे गेली होतीस? मी किती टेन्शन मध्ये आलेलो माहीत आहे तुला..फोन का बंद ठेवला आहेस? खूप वेळ बेल वाजवून पण जेव्हा तू दरवाजा उघडला नाहीस, तेव्हा मनात नको नको ते विचार आले..तुला काही झालं असतं तर मी काय करणार होतो..मी नाही राहू शकत तुझ्याशिवाय गौरी..मी रात्रभर खूप विचार केला आणि आज सकाळी तुला हो बोलायचं असं ठरविलं..पण जेव्हा तू दरवाजा नाही उघडलास आणि तुझा फोन ही बंद आला तेव्हा.." असे म्हणून तो क्षणभर थांबला आणि तो त्याच्या गुढघ्यांवर बसला व त्याने गौरीचा हात हातात घेतला आणि तो म्हणाला, "मी माझे पाहिले प्रेम कधीच नाही विसरू शकत..पण मी तुला हरवून ही नाही जगू शकत..मी तुझ्यावर खूप खूप प्रेम करेन आणि तुला खूप खुश ठेवीन..माझ्याशी लग्न करशील??"

गौरी हे ऐकून खूप आनंदी झाली तिने खाली बसून समीरला घट्ट मिठी मारली आणि त्याच्या प्रश्नाला होकार दर्शवला..

आणि कुठूनतरी हे गाणं ऐकू येत होतं..

🎶तेरे लिए जानम तेरे लिए

ये मेरी साँसें, ये मेरा जीवन

बिन तेरे जीना भी क्या

तेरे लिए जानम तेरे लिए।।

होगी कोई ना ऐसी दीवानी

तुझसे जूड़ी है मेरी कहानी

होगी कोई ना ऐसी दीवानी

तुझसे जूड़ी है मेरी कहानी

तेरी वफ़ा के आगे में हारा

आँखों में तेरा चेहरा उतारा

साथ जीना है, तेरे साथ मरना है

हर घडी सनम बस प्यार करना है

मैं तो दीवाना हुआ

तेरे लिए जानम तेरे लिए🎶

गौरी आज खूप खुश होती..तिच्या प्रेमाचा समीरने स्वीकार जो केला होता..तरीही तिला मनात कुठेतरी वाटतं होतं की, समीरचे खरे प्रेम आर्यावरच आहे..जरी ते एकतर्फी असले तरी..

पण तिला हे ही माहीत होतं की, समीर आता आयुष्यात पुढे निघून गेलाय आणि आता तो फक्त तिचा आहे..फक्त तिचा..असा विचार करून गौरी तिच्या सुखी भविष्याची स्वप्ने बघू लागली..आणि बघता बघता ती कधी झोपली तिला कळलेच नाही..

इथे समीर गौरीचाच विचार करत होता..त्याला माहीत होतं की, आर्याची वाट बघणं आता व्यर्थ आहे..कारण म्हणतात ना, "आपण ज्याच्यावर प्रेम करतो त्याच्या आनंदातच आपला आनंद असला पाहिजे".

समीर अगदी ह्याच विचारांचा होता म्हणून तर तो आर्याच्या आयुष्यातून इतका लांब निघून आला होता..

त्याला आर्याच्या आठवणींमध्येच उरलेलं आयुष्य काढायचं होतं..पण देव नेहमी चांगल्या लोकांबरोबर चांगलंच वागतो, म्हणून देवाने समीरच्या आयुष्यात गौरीला आणलं होतं..त्याच्या हृदयातील जखमांना भरून त्याला एक सुखद आयुष्य देऊ केलं होतं..फरक इतकाच होता की, जिथे समीर कधीकाळी उभा होता..आज तिथे गौरी होती..जसे समीरला आर्यावर प्रेम झालं होतं..अगदी तसच वा त्याहूनही जास्त गौरीचं प्रेम समीरवर होतं..आणि आता समीरने गौरीला होकार देऊन गौरीला तिचं प्रेम देऊ केल होतं..आता त्याच्या जगण्याचं एकच कारण होतं, ते म्हणजे गौरी...

(काही महिन्यांपूर्वी मुबंई मधली सकाळ!!)

"आर्या, अगं उठ बाळा आता..ऑफिसला नाही जायचंय का? साडे आठ वाजत आले..जळलं मेलं ते लक्षण..नजरच लागली अमेयला..त्याचा प्रोग्रॅमच बंद पडला..काय आवाज होता त्याचा..आता जमतंय का कोणाला त्याच्यासारखं लाघवी बोलायला." सुकन्या काकू असं बोलत बोलत स्वयंपाक खोलीत गेल्या..

आर्या उठली आणि तयारी करून नेहमीप्रमाणे ऑफिसला निघाली..आज प्रथमच तिची सकाळ अमेयच्या आवाजाने झाली नव्हती..ती अमेयला म्हणजेच समीरला खूप मिस करत होती..ती स्वतःशीच पुटपुटली, "मिस यु अमेय"..

आज स्निग्धा ऑफिसला येणार नव्हती..सो आर्याला एकटच ऑफिसला जायचं होतं..तिने किती दिवस रेडिओ सुद्धा लावला नव्हता..ती फटाफट तयार होऊन ऑफिसला निघून गेली..

तिला आज ऑफिसला जायची इच्छा होत नव्हती..तिने अनिशला फोन करून खोटं सांगितलं की, ती एक महत्वाच्या मीटिंगमध्ये आहे आणि ती संध्याकाळी फ्री होईल. मगच ती त्याला फोन करेल आणि तिने तिचा फोन सायलेंट केला आणि ती थेट चौपाटीवर गेली आणि त्या

फेसळणार्या समुद्राकडे एकटक पाहत राहिली..आज तिला स्वतःसाठी वेळ हवा होता..एकांत हवा होता..

ती समीरचा विचार करत होती..त्याच्याबरोबर घालवलेला प्रत्येक क्षण तिला आठवत होता..ते क्षण आठवता, ती मंद हसली..तिने कधीच विचार केला नव्हता की, समीर हाच अमेय होता..अमेयला भेटण्यासाठी तिने काय नाही केलं आणि तो तर नेहमी तिच्याबरोबरच होता..तेव्हा तिला तिच्या साखरपुड्यातला दिवस आठवला आणि तिचे डोळे पाणावले.. त्यादिवशी ती इतक्या शॉक मध्ये होती की, काय करावं हे तिला कळत नव्हतं..समीर जाताना त्याला थांबवावं असं तिला फार वाटतं होतं..पण तिचं प्रेम तर अनिशवर होतं ना!!

ती मनात विचार करत होती, "कुठे असेल समीर? कसा असेल? त्याने एकदाही मला भेटायचा प्रयत्न का नाही केला?" ती इतकी कन्फ्युज होती की, तिला हेच समजत नव्हते की, अनिश तिच्याबरोबर असताना ती समीरला इतकी का मिस करतेय..तिला स्निग्धाची खूप आठवण येत होती कारण या द्वंद्वातून तीच आर्याला बाहेर काढू शकत होती..

आर्याने स्निग्धाला फोन करण्यासाठी तिचा फोन हातात घेतला तर त्यामध्ये अनिशचे १२ मिस् कॉल होते.. तिने लगेच अनिशला फोन केला..आर्याचा आवाज ऐकताच अनिश रडायला लागला..त्याला धड बोलताही येत नव्हते..इतक्यात कोणीतरी त्याच्या हातातून फोन घेतला..तेव्हा कळले की, अनिशच्या आईला हार्ट अटॅक आला आहे आणि तिला अतिदक्ष विभागात ठेवण्यात आले आहे..आर्या काहीवेळातच हॉस्पिटलमध्ये पोहोचली..सगळे रिपोर्ट येईपर्यंत संध्याकाळ झाली.

डॉक्टरांनी अनिशला कॅबिनमध्ये बोलविले आणि ते म्हणाले,"तुझी आई ह्या प्रसंगातून थोडक्यात वाचली आहे..आता तिची तुम्हाला जास्त काळजी घ्यावी लागेल..तिला कसलाही स्ट्रेस देता कामा नये..तिला खूप जपावं लागेल..सध्यातरी तिला दगदग करून चालणार नाही.."

अनिशने डॉक्टरांचे नीट ऐकून घेतले..तो ह्याच वाक्याने खुश झाला की, त्याची आई आता ठीक आहे..डॉक्टरांनी तिला महिनाभर तरी विश्रांती घ्यायचा सल्ला दिला..आर्या आणि अनिश दोघेही गोडबोले काकूंना म्हणजेच अनिशच्या आईला बघायला तिच्या रूममध्ये गेले..काकूंना अजून २ दिवस तरी अतिदक्ष विभागातच ठेवण्यात येणार होते..आर्या आणि अनिशला पाहून काकू खूप खुश झाल्या..आता लवकरात लवकर त्यांना आर्याला त्यांच्या घरी कायमचे आणायचे होते..काकूंनी तशी इच्छा दोघांना बोलून ही दाखवली..दोघांनाही काकू बऱ्या होऊन घरी आल्याशिवाय लग्नाचा विषय नको होता..तरीही काकूंसाठी त्या दोघांनी होकार दिला..

काकू घरी येईपर्यंत आर्याने काकूंची खूप काळजी घेतली..स्वतःच्या आईप्रमाणे त्यांचं सर्व काही केलं..काकू घरी आल्यावरही आर्या घरातले सर्व काही बघत होती..अनिश तर हे सर्व पाहून भारावून गेला..आर्या आता इतकी व्यस्त झाली होती की, तिचा स्वतःसाठी विचार करायला वेळच नव्हता..तिने ऑफिसमध्ये १५ दिवसांची सुट्टी सांगितली होती..ती फक्त झोपण्यासाठी तिच्या घरी जात असे..बाकी पूर्ण दिवस ती गोडबोले काकूंची काळजी घेण्यात घालवत असे..अनिश घरी आला की, मग ती जेवून, सर्व आवरून तिथून निघत असे..

काकू आता हळूहळू बऱ्या होत होत्या..आर्या ही आता ऑफिसात पुन्हा रुजू झाली..अनिशने त्याच्या आईची समजूत काढून २-३ महिन्यासाठी लग्नाचा विचार पुढे ढकलला..कारण डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार काही दिवस तरी गोडबोले काकूंना दगदग करता नये होती..

असेच काही महिने निघून गेले..आता गोडबोले काकू पूर्णपणे बऱ्या होत्या..त्यांचे पथ्यपाणी व्यवस्थित चालले होते..आज जोशी कुटूंबाला मुद्दामूनच त्यांनी रात्रीच्या जेवणाला बोलविले होते..कारण त्यांना आता आर्या आणि अनिशच्या लग्नाचा विषय काढायचा होता..पण त्याआधी त्यांनी सर्वप्रथम ह्या विषयावर अनिश आणि त्याच्या बाबांशी चर्चा केली..यावर अनिशने संमती दर्शविली..फक्त त्याची एक अट होती..लग्न अगदी साधेपणाने व्हावे..मोजक्याच जवळच्या लोकांना बोलवून..

काकूंना प्रथम हे अमान्य होतं पण त्या आताच बऱ्या झाल्या आहेत व अजून त्यांना दगदग नको..असे जेव्हा अनिशने त्यांना पटवून सांगितले..तेव्हा त्या ह्या गोष्टीला तयार झाल्या..पण आर्याशी आणि तिच्या घरच्यांशी बोलल्याशिवाय त्यांना कोणताही निर्णय घायचा नव्हता..

आर्या आणि तिच्या कुटूंबाचे अनिशने आणि त्याच्या आईवडिलांनी स्वागत केले..काही औपचारिक गोष्टी झाल्यानंतर गोडबोले काकूंनी सरळ विषयाला हात घातला आणि त्यांनी आर्या व तिच्या आई-बाबांना पुढच्या काही महिन्यातले काही मुहूर्त दाखविले..आर्याचे आई बाबा तर खूपच खुश झाले..पण गोडबोले काकूंना आर्याची संमती हवी होती..तिने अनिशकडे बघितले आणि तुम्ही जे म्हणाल ते..असे ती म्हणाली..

मग काय २ महिन्यांनी जो पहिला मुहूर्त होता तो ठरला..अनिश आणि आर्याच्या म्हणण्यानुसार लग्न अगदी साधेपणाने करायचे ठरले..अगदी मोजकीच घरातील मंडळी आणि मित्र-परिवार..

अनिश तर इतका खुश होता की, बोलायला शब्द अपुरे पडतील..आर्या ही खूप खुश होती..अनिश तर अगदी मनातल्या मनात हेच म्हणत होता..

🎶🎶हिरिये सेहरा बांधके मे तो आया रे।।

डोली बारात भी साथ मे, मे तो लाया रे।।

अब तो ना होता है एक रोज इंतेजार सोनी।।

आज नही तो कल है तुझको तो बस मेरी होनी रे।।

तेनू लेके मे जावांगा, दिल देके मे जावांगा🎶🎶

आर्या आणि अनिशचे लग्न २ महिन्यांनी ठरलं..दोघांच्याही घरातले खूप खुश होते..जोशी काकू आणि गोडबोले काकू दोघीही तयारीला लागल्या..

जोंशी काकूंना सर्व तयारी आर्याच्या पसंतीनेच करायची होती..खरेदी, दागिने, भेटवस्तू, मानपान!!!..बापरे!! किती गोष्टींची तयारी करायची होती..त्यांना लग्नात कसलीच कसर सोडायची नव्हती..त्यांच्या लाडक्या आर्याचे जे लग्न होते..

गोडबोले काकूंचे ही तसेच होते..पण त्यांना दगदग होऊ नये म्हणून अनिश आणि त्याच्या बाबांनी सगळया लग्नाच्या तयारीची जवाबदारी स्वतःवर घेतली होती..सर्व धावपळ जरी ते दोघे करीत असले तरी काकूंच्या सल्ल्यानुसार सगळे चालले होते..काकूंना अनिशचे लग्न खूपच धामधुमीत करायचे होते..पण त्याच्या ह्या अचानक च्या आजारामुळे अनिशला हे लग्न अगदी साधेपणाने आटपायचे होते..पण जेव्हा आर्याच्या घरच्यांनी याला दुजोरा दिला..तेव्हा काकूही यासाठी तयार झाल्या..

आर्या आणि अनिशची सर्व खरेदी ते दोघे मिळून करतील असे ठरले..सगळे काही ठरल्याप्रमाणे होत होतं..अनिशने एका दुकानातून घरीच साडी खरेदी करण्याचा प्रोग्रॅम ठेवला होता म्हणून गोडबोले आणि जोशी काकू दोघांनाही घरी आरामात बसून त्यांच्या आवडीच्या साड्या खरेदी करता आल्या..दोघींनीही अनिशच्या ह्या कल्पनेची प्रशंसा केली..

हॉल, जेवण, आमंत्रणे!!..बघता बघता काही दिवसांवर लग्न येऊन ठेपलं..परगावाहून येणाऱ्या मोजक्या पाहुण्यांची सोय ही अनिशने उत्तम रित्या आधीच करून ठेवली होती..जेणेकरून त्याच्या आईला काहीही दगदग न करता सर्वांसोबत वेळ घालवून..लग्न उत्तमरीत्या एन्जॉय करता येईल..

इथे, आर्याच्या घरीही जवळ जवळ सगळी तयारी होत आली होती..आर्याची आत्या काही कारणांमुळे तिच्या साखरपुड्याला उपस्थित राहू शकली नव्हती..पण लग्नासाठी ती आणि तिचे यजमान आणि त्यांचा मुलगा चार दिवस आधीच येणार होते..जोशी काकूंनी तशी ताकीदच त्यांना दिली होती..आणि तसं पण आपल्या एकुलत्या एका भाचीचं लग्न आत्या कशी मिस् करेल..

आर्याची आत्या??? अहो!! अजून नाही समजलं का तुम्हाला..आपल्या सुमती काकू!! आपल्या गौरीच्या आई!! शास्त्री काकांच्या मिसेस..

आश्चर्य वाटलं ना!!

म्हणजे समीर कितीही दूर गेला तरी तो आर्याच्या जवळच होता..अगदी एका हाकेच्या अंतरावर!!

असो, आर्याची आत्येबहीण गौरी काही कारणामुळे लग्नाला येऊ शकत नव्हती..आर्या ह्यासाठी गौरीवर थोडी नाराजही झाली पण तिलाही माहीत होतं की, महत्वाचं काम असल्याशिवाय गौरी असं करणार नाही..पण गौरीने आर्याला लग्नानंतर अनिशला घेऊन एकदातरी बेंगलोरला फिरायला यायला आमंत्रण दिलं..आर्यानेही हो म्हणत संमती दर्शविली..

हा हा म्हणता, लग्न अगदी ४ दिवसांवर येऊन ठेपलं..शास्त्री कुटूंब ही मुंबईत दाखल झालं..ऋग्वेद आणि वेदांतची तर लगेच गट्टी जमली..जोशी काकू आणि काकांनी शास्त्री कुटूंबाचं स्वागत केलं..शास्त्री काकू आणि जोशी काकू पुढच्या समारंभाच्या कामाला लागल्या..

दोन्ही घरात पाहुण्यांची रेलचेल वाढली..हळदीचा दिवस ही उजाडला..अनिशला हळद लावून त्याची उष्टी हळद आर्याच्या घरी पोहचवण्यात आली..दोन्ही घरातल्या मंडळींनी भरपूर नाचतगात..आपापल्या घरी म्हणजे अनिशच्या घरी त्याच्या घरातल्यानी आणि आर्याच्या घरी त्याच्या घरातल्यानी भरपूर धमाल केली..हळदही खेळली गेली..हळदीचा कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडला..अनिश आणि आर्याची नजरही काढण्यात आली..

हळदीच्या आणि लग्नाच्या मध्ये एक दिवसाचा गॅप मुद्दामूनच ठेवण्यात आला होता..कारण हळदीला नाचून आणि हळद खेळून जवळ जवळ सगळेच दमले होते..तसेच लग्नाचा दिवस म्हटला की, एक मिनिट ही कोणाला उसंत नसते..म्हणून लग्नाची तारीख तशीच ठरविण्यात आली होती..शिवाय गोडबोले काकूंना ही जास्त दगदग ठीक नव्हती..

अनिश आणि आर्या दोघेही खूपच खुश होते..इतक्या महिन्यात इतके काही घडून गेले होते की, आर्या समीरला हळूहळू विसरू लागली होती..तिच्या जीवनात आता ती.. अनिश आणि त्याच्या कुटूंबाला प्रथम प्राधान्य देत होती आणि हेच तिचे कर्तव्य होते..कारण ती आता गोडबोले घराण्याची सून आणि अनिशची अर्धांगिनी जी होणार होती..

लग्नाचा दिवस उजाडला..बँड-बाजासहीत अनिशची वरात लग्नाच्या हॉलवर पोहोचली..अनिश एखाद्या राजकुमारसारखा दिसत होता..त्याचे स्वागत करण्यासाठी जोशी कुटूंब आणि शास्त्री कुटूंब तयार होते..

पण नशिबात पुढे काय वाढून ठेवले आहे हे कोणीच सांगू शकत नाही..पुढच्या क्षणी काय होईल ह्याची हमी कोणी देऊ शकत नाही..

अनिश एखाद्या राजकुमारासारखा घोड्यावर बसला होता..गोडबोले कुटूंब व त्यांचे सगळे पाहुणे वरातीत नाचत होते..सगळे खूपच आनंदित होते..अनिशच्या मित्रांनी फटाक्यांची आतिषबाजी करत..पाच हजारांची फटाक्यांची माळ लावली..आणि जे घडायचे नव्हते तेच घडले..एक फटाका चुकून घोड्याच्या पायाखाली आला..त्यामुळे तो घोडा पुरता जखमी झाला आणि हा हा म्हणता तो चांगलाच उधळला..त्याने अनिशला पाठीवरुन खाली फेकले..आणि तो गर्दीत मिळेल त्याला तुडवू लागला..त्याला गर्दीतुन बाहेर जायला वाट न मिळाल्यामुळे त्याने एकाच जागेवर थैमान घालायला सुरुवात केली..तो स्वतःच्या मालकाला ही आवरत नव्हता..सगळे घाबरून गेले..अनिश चांगलाच त्याच्या तावडीत सापडला..सगळेजण स्वतःचा जीव वाचविण्यासाठी सैरभैर पळू लागले..कोणीही पुढे जाऊन अनिशला बाजूला करायची हिम्मत केली नाही..गोडबोले काकू जिवाच्या आकांताने ओरडत होत्या पण त्या घोड्याने असा काही थैमान घातला होता की, त्याला काबू करणे खरच अशक्य होते..अनिश भरपूर जखमी झाला होता..त्याच्या डोक्याला मार लागला होता आणि खूप रक्त सुद्धा वाहिले होते..

तो घोडा वाट मिळताच तिथून पळून गेला व त्याचा मालक त्याच्या पाठी पळाला..घोडा निघून जाताच सगळे अनिशकडे धावले..अनिश बेशुद्ध झाला होता..अनिश घोड्यावरून पडल्यावर तो उठायच्या आधीच त्या घोड्याने अनिशला त्याच्या पायाने मारायला सुरुवात केली होती आणि त्यामुळे अनिशला जागेवरून हलने ही मुश्किल झाले होते..त्याच्या सततच्या मारण्यामुळे अनिश रक्तबंबाळ झाला होता..अनिशला तातडीने गाडीतून रुग्णालयात दाखल करण्यात आले..डॉक्टरांनी त्याची योग्य तपासणी केली पण त्या घोड्याची एक लाथ अनिशच्या छातीवर जोरदार बसल्यामुळे अनिशला जबर आतून मार बसल्याची शक्यता होती..अति रक्तस्त्राव झाल्यामुळे तातडीने त्याच्यावर शस्त्रक्रिया करणे जरुरी होते..

इथे आर्या खूप छान सजली होती..तिने पिवळया रंगाची नऊवारी साडी घातली होती..गळयात आणि कानात साजेसे दागिने घातले होते..हातातल्या हिरव्या बांगड्या हातावर काढलेल्या मेहेंदीला शोभून दिसत होत्या..कधी एकदा अनिश येतो असे आर्याला झाले होते..अगदी दृष्ट लागण्यासारखी दिसत होती आज आपली आर्या..

इतक्यात वरात आली असा स्निग्धचा आवाज आर्याच्या कानावर पडला..स्निग्धा आर्याला चिडवायला लागली..आर्या लाजेने अगदी लाल झाली होती..काही वेळात जोरात फटाक्यांचा आवाज झाला आणि नंतर अचानक कसलीतरी गडबड झाल्याचे आढळून आले..कसला आवाज हे बघण्यासाठी स्निग्धा बाहेर गेली..पहाते तर काय!! घोडा उधळला होता आणि त्याने अनिशला खाली पाडले होते..ती आर्याजवळ जाणार इतक्यात आर्याचं बाहेर आली..घोडा इतका सैरभैर झाला होता की, अनिशला बाजूला काढणे खूपच कठीण होते..आर्याने स्वतः पुढे जाण्याचा प्रयत्न केला पण तिला दुखापत होऊ नये म्हणून तिला कोणी पुढे जाऊ दिले नाही..इतक्यात अनिश बेशुद्ध पडला..आर्या जागच्या जागी कोसळली..घोडा त्या गर्दीतून निसटताच सगळयांनी अनिशकडे धाव घेतली..कोणीतरी अनिशला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्यासाठी गाडी बाहेर

काढली..आर्याही त्या गाडीत बसली..अनिशची आई आणि आर्याची आई दोघीही रडत होत्या..आर्याची आत्या म्हणजेच आपल्या गौरीची आई त्या दोघींना धीर देत होत्या..

(बँगलोरची सकाळ)

आज गौरीची सकाळ खूपच छान आणि रोमँटिक होती..आजचा पूर्ण दिवस तिने समीर बरोबर घालवायचा ठरवला होता..त्याप्रमाणे तिने सकाळीच उठल्याउठल्या समीरला फोन केला होता..त्यानेही तिला चालेल असे म्हटले होते..

आर्या उठून फ्रेश झाली आणि मग तिने नाश्ता बनवला व ती समीरची वाट पाहू लागली..त्याआधी समीरला १० फोन करून झाले होते..ती परत फोन करणार इतक्यात तिच्या बाबांचा म्हणजेच शास्त्री काकांचा फोन तिच्या मोबाईलवर आला..तिने फोन उचलला आणि तिच्या बाबांनी जे तिला सांगितले ते ऐकून तिच्या हातातला फोन खाली पडला..समीर तेवढ्यातच घरात आला..त्याने गौरीकडे पाहिले आणि तिच्या हातातून खाली पडलेला तिचा फोन उचलला तर तो शास्त्री काकांचा होता..काकांनी समीरला इथे काय घडले ते सगळे सांगितले आणि तातडीने जी मिळेल ती फ्लाइट पकडून मुबंईला यायला सांगितले..गौरी अजूनही शॉक मध्ये होती..समीरने तिला पाणी दिले..गौरी हमसून हमसून रडू लागली..

समीरने तातडीने बँगलोर - मुबंई ची २ तिकिटे बुक केली आणि काही वेळातच ते एअरपोर्टला जायला निघाले..गौरीला आर्याची खूप काळजी वाटत होती..ती पूर्ण प्रवासात नुसती रडत होती..तिने एक चकार शब्द ही उच्चारला नाही..मुबंई एअरपोर्टवर त्यांना नेण्यासाठी गाडी पाठवली गेली होती..ते आधी हॉस्पिटल मध्ये जाणार होते..

समीरला शास्त्री काकांकडून हेच कळले होते की, गौरीच्या मामेबहिणीचा नवरा हॉस्पिटलमध्ये सिरीयस आहे..आणि त्यासाठी तातडीने गौरीला मुबंईला घेऊन यायचे आहे..पूर्ण प्रवासात समीर हाच विचार करत होता..

पुन्हा मुबंई!!

समीर आणि गौरी मुबंईला पोहोचले..शास्त्री काकांनी त्यांना आणायला आधीच गाडी पाठविली होती..त्या गाडीचा ड्राइवर गौरीच्या नावाची पाटी घेऊन उभा होता..दोघेही गाडीत बसले..समीरने मनात विचारही केला नव्हता की, इतक्या लवकर तो परत मुबंईला येईल..कारण काहीही असुदेत, पण तो पुन्हा मुबंईत आला होता..हे मात्र खरे.. जिथे त्याच्यासाठी सगळीकडे फक्त आर्याच्या आठवणी भरल्या होत्या..

गौरी अजूनही शांतच होती..तिने गाडीमध्ये हलकेच स्वतःचे डोके समीरच्या खांद्यावर ठेवले..समीरने ही तिला आधार दिला..काही वेळातच गाडी हॉस्पिटलसमोर येऊन थांबली..ते दोघे गाडीतून खाली उतरले..त्यांचे सामान गाडीतच होते..ड्रायव्हरला शास्त्री काकांनी आधीच सूचना दिल्याप्रमाणे तो त्या दोघांना हॉस्पिटलमध्ये सोडून त्यांचे सामान घेऊन आर्याच्या घरी ते सामान ठेवायला निघून गेला..

गौरी आणि समीर हॉस्पिटलमध्ये शिरले..हॉस्पिटलमध्ये आता आर्या एकटीच होती कारण अतिरक्तस्रावामुळे अनिशला रक्ताची गरज कधीही भासू शकत होती..म्हणून रक्त कमी पडू नये याकरता शास्त्री काका आणि जोशी काका रक्ताची सोय करायला ब्लड बँकमध्ये गेले होते..तसेच स्निग्धा ही नेमकी पाणी आणण्यासाठी खाली गेली होती..गौरी आणि समीर ऑपेशन थिएटर असलेल्या मजल्यावर आले..

इतक्यात गौरीचा फोन कोणाचातरी धक्का लागून खाली पडला म्हणून ती तो फोन उचलायला खाली वाकली..तितक्यात आर्याची नजर समीरवर गेली..गौरी खाली वाकल्यामुळे आर्याला ती पटकन दिसली नाही..आर्या समीरला बघून इतकी खुश झाली की, काय करावे काय करू नये असे तिला झाले..

समीर पण आर्याला पाहून शॉकच झाला..काही क्षण जणू त्या दोघांसाठी वेळ थांबलाच होता..दोघांच्याही डोळ्यात पाणी तरळले..इतक्या दिवसांचं मनात साठवून ठेवलेले सगळे काही अश्रूंच्या रुपात बाहेर पडले..

आर्याला स्वतःवर ताबा ठेवणे जणू मुश्किल झाले होते..तिने धावत जाऊन समीरला मिठी मारली व ती खूप रडू लागली..समीरने ही तिला जवळ घेऊन तिचे सांत्वन केले..

आर्याला विश्वासच होत नव्हता की, ती समीरच्या मिठीत होती..

इतक्यात, गौरीने आर्याला हाक मारली..तशी आर्या भानावर आली...

अरेच्चा!!! हे तर स्वप्न होते..

गौरीने आर्याला मिठी मारली आणि ती रडू लागली..समीर गौरीच्या मागेच उभा होता..आर्याने समीरकडे पाहिले.. समीरला काय बोलावे हेच कळत नव्हते..समीरने स्वतःच्या भावनांवर कसाबसा ताबा ठेवला..

इतक्यात तिथे शास्त्री काका आणि जोशी काका ही आले..

आर्याला समीरशी खूप काही बोलायचे होते..पण तिच्या तोंडून शब्द फुटत नव्हते..

इतक्यात स्निग्धाही तिथे आली आणि तिने समीरला पाहताच ती शॉक झाली..

ती म्हणाली, "समीर तू इथे कसा काय?? कुठे गेला होतास यार..किती मिस् केलं आम्ही सगळ्यांनी तुला..तुला अनिशबद्दल कोणी सांगितलं??"

असे विचारून प्रश्नार्थक नजरेने ती समीरकडे पाहायला लागली..

समीर काही बोलणार, तेवढ्यात गौरी म्हणाली, "समीर माझ्याबरोबर आलाय..अनिश जिजूंबद्दल कळल्यावर मी तातडीने इथे यायला निघाली..म्हणून मला सोबत म्हणून तो इथे आलाय.."

स्निग्धाला काय चाललय हे कळतच नव्हते..ती मनातल्या मनात पुटपुटली, "आता ही बया कोण? आणि ती अनिशला जीजू का म्हणतेय? समीर तिच्याबरोबर काय करतोय? बापरे, माझ्या डोक्याचा आता भुगाच होईल..जाऊदेत बाई..बघूया काय होतंय ते"

इतक्यात डॉक्टर ऑपरेशन थिएटर मधून बाहेर आले..त्यांनी आर्याकडे बघून हलकीशी स्माईल केली..आणि ते बोलू लागले, "घाबरायचे काही कारण नाही..अनिश आता धोक्यातून बाहेर आहे..तो मुक्का मार लागल्यामुळे बेशुद्ध झाला होता..तसेच त्याचे इंटर्नल रक्तही खूप गेले त्यामुळे त्याच्यावर किरकोळ शस्त्रक्रिया करावी लागली पण आता तो एकदम ठीक आहे..थोडे हातापायाला बँडेज आहे आणि त्याला काही दिवस हॉस्पिटलमध्येच राहावे लागेल..१५ दिवसात तो चालयलाही लागेल..त्याला हॉस्पिटल रूम मध्ये शिफ्ट केल्यावर तुम्ही त्याला भेटू शकता"

हे सगळं ऐकल्यावर आर्या खूप खूप खुश झाली..तिने अनिशच्या आई-बाबांना फोन करून आनंदाची बातमी सांगितली..आणि घाई न करता सावकाश हॉस्पिटलमध्ये या असे सांगितले..तिने जोशी काकांना ही मिठी मारली..गौरी आणि समीरही खुश झाले..

थोड्यावेळाने आर्या आणि जोशी काका अनिशला भेटायला आत गेले..समीर एव्हाना शुद्धीवर आला होता..त्याने आर्याला जवळ बोलविले आणि तो मंद हसला व म्हणाला, "आर्या मी ठीक आहे आता..प्लीज रडू नकोस"

आर्याने हो म्हटले आणि त्याच्या हाताचा हलका किस घेतला..इतक्यात गौरी आणि समीर व शास्त्री काका ही आत आले..अनिशने समीरला पाहताच तो भलताच खुश झाला आणि म्हणाला, "अरे, समीर तू इथे कसा?" त्याच्याबरोबर गौरीला आलेले पाहून तो थोडा चकित झाला. तो पुढे म्हणाला,"ही गौरी ना!! पण तू समीरबरोबर?"

आर्या बोलू लागली, "मी तुझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे देईन..पण आधी तू आराम कर,बाकी गोष्टी आपण नंतर बोलू"

गौरी आणि समीरने ही अनिशचा निरोप घेतला आणि ते दोघे शास्त्री काकांबरोबर आर्याच्या घरी निघून गेले..

मग स्निग्धा आत आली आणि अनिशला भेटून नंतर परत येते असे सांगून ती घरी निघून गेली.

अनिशला हॉस्पिटलमध्ये ऍडमिट होऊन २ दिवस झाले होते..आता त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत होती..त्याला पूर्ण बरे व्हायला अजून १०-१२ दिवस लागणार होते..

समीर आणि गौरी अनिश ठीक आहे कळल्यावर दोन दिवसातच बँगलोरला परतली..शास्त्री काका आणि काकू अजून काही दिवस मुबंईतच राहणार होते..वेदांत ही त्यांच्याबरोबर मुबंईतच थांबणार होता..

समीरच्या खूप मनात आले की, जायच्या आधी एकदा आर्याला भेटावे..पण आता पुन्हा त्याला ह्या सगळ्यात अडकायचे नव्हते..कारण गौरीच्या रुपात त्याला त्याचे खरे प्रेम मिळाले होते आणि आता गौरीला तो गमावू शकत नव्हता..

बँगलोरला पोहोचल्यावर समीरने गौरीला सांगितले की, तो आर्याच्या कंपनीत कामाला होता..म्हणूनच स्निग्धाने त्याला ओळखले आणि RJ अमेय म्हणून अनिश काम करत असलेल्या रेडिओ स्टेशनवर सुद्धा तो पार्ट टाईम नोकरी करत होता म्हणून अनिशही त्याला ओळखत होता.. पण एकाएकी कोणाला ही न सांगता त्याने ह्या दोन्ही नोकऱ्या सोडल्या आणि तो बँगलोरला शिफ्ट झाला..म्हणून कदाचित त्याला अचानक पाहून सगळे चकित झाले होते..असे समीर गौरीला म्हणाला..पण..............

त्याच्या खूप मनात येऊन देखील त्याने गौरीला आर्या हीच ती मुलगी आहे..ज्यामुळे तो मुबंई सोडून बँगलोरला आला होता..हे नाही सांगितले..करण काहीही झाले तरी आर्या ही गौरीची मामेबहिण होती..म्हणजे अगदी जवळची..म्हणून त्याने ही गोष्ट गौरीपासून लपवून ठेवली..

तसे पण कधी कधी काही गोष्टी ह्या गुप्त राहिलेल्याच चांगल्या असतात..म्हणून कदाचित आर्याही गप्प होती..तिचे खरे प्रेम तर अनिशवरच होते ना!!

अमेय हे तिचे फक्त आकर्षण होतं..ते पण जेव्हा तिला कळले की, अमेय हाच समीर आहे.. तेव्हा ती थोड्यावेळासाठी कन्फ्युज जरूर झाली होती..पण जेव्हा तिला रिअलाइझ झाले की, समीर तर तिचा फक्त जवळचा मित्र होता..प्रेम नाही..तेव्हा ती पुन्हा अनिशमध्ये हरवून गेली..प्रेमाचं कसे असते ना!! ते एकाला दुसऱ्याशी आणि दुसऱ्याला तिसऱ्याशी होऊन जातं..मग ते इतके गुंतते की "गुंतता हृदय हे!! अशी कथा बनते..

(१ महिन्यानंतर मुबंईत)

अनिश आता पूर्णपणे बरा झाला होता..काही दिवसांनी अनिश आणि आर्याने अगदी साध्या वैदिक पद्धतीने मंदिरात लग्न केले..अर्थात, घरातील सर्व मंडळींच्या उपस्थितीत..लग्नाला मोजकीच लोकं होती..शास्त्री कुटूंब ही आवर्जून आलं होत लग्नाला..समीरला अचानक दिल्लीला एक कॉन्फरन्स साठी जावे लागले..म्हणून तो काही उपस्थित नव्हता लग्नाला.. पण त्याने आर्या आणि अनिशसाठी गौरी समवेत शुभेच्छा नक्कीच पाठविल्या होत्या..एकदाचे लग्न निर्विघ्नपणे पार पडले..आता आर्या जोशीची ऑफिशिअली आर्या अनिश गोडबोले झाली होती..

~समाप्त~

नमस्कार वाचकहो,

"गुंतता हृदय हे!! ही कथा मी २०१९ च्या गणपतीच्या दिवसांत लिहायला घेतली..खरं म्हणजे मी लिहिताना विचारही केलाच नव्हता की, ही कथा इतकी लोकप्रिय होईल आणि मी तिचे दोन पर्व लिहू शकेन..मी कथेचा शेवट खरं तर पहिल्या पर्वातच केला होता..पण काही वाचकांना तो अर्धवट वाटला..म्हणून मी दुसरे पर्व लिहायला घेतले..मला कथेचे भाग पोस्ट करायला ही बराच उशीर झाला..यासाठी मी तुमची क्षमा मागते..मधेच मी खूप दिवसांचा मोठा

ब्रेक ही घेतला होता..पण पुन्हा लिहायला सुरुवात केल्यावर तुम्ही पहिल्यासारखाच ह्या कथेच्या उर्वरित भागांना ही प्रतिसाद दिलात..ह्यासाठी तुम्हा सर्व वाचकांचे खूप खूप धन्यवाद.

ही संपूर्ण कथा तुम्हाला कशी वाटली हे मला नक्की कळवा..तुमच्या मित्र-मैत्रिणीबरोबर नक्की share करा..

**~समाप्त~ पर्व**

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. प्रीती सावंत -दळवी यांचं हे तिसरं पुस्तक.**

प्रीती सावंत दळवी गेली अनेक वर्षे कथा लिहीत आहेत. फ़ेसबुकवर त्यांच्या कथांचं वेगळं पेजही आहे. तिथे त्यांचा खास चाहता वर्ग आहे. या चाहत्यांची इच्छा होती की त्यांचं स्वतःचं एक स्वतंत्र पुस्तक व्हावं. पण लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. अशा तरूण लेखकांना बळ देण्यासाठी आपण सर्व वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आता कटीबद्ध आहोत. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य.

लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत.

ई साहित्य प्रतिष्ठान

त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

शुभम पाटील, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे, प्रीती सावंत दळवी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?